वनपरीक्षेत्र अधिकारी, मुंबई कांदळवन संधारण घटक पश्चिम मुंबई, यांचे कार्यालय.
स. न. १५५ पंचम सोसायटी जवळ, गोखले महाविद्यालय मार्ग, गोराई, बोरीवली (प.) ४०० ०९१
Email:- rfomangrovewm@gmail.com

विषय : मा.विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांच्या अध्यक्षेत खालील कांदळवन संरक्षण व संवर्धन अनियंत्रण समितीमध्ये श्री. रेजी अब्राहिम यांनी केलेल्या तक्रार अर्जावर स्थळपहाणी व चौकशी करण्याबाबत..

जा.क्र. प.मुंबई /अंधेरी तक्रा./ 369 /2019-20

बोरीवली दि. 23/09/2019

प्रति,

मा. विभागीय वन अधिकारी

मु.का.स.घ.

मार्फत : मा.सहा.वनसंरक्षक, कादंळवन संरक्षण,मुंबई

संदर्भ : वनपाल अंधेरी प.मुंबई मु.का.सं.घ जा.क्र.56 दि.22.08.2019.

महोदय

उपरोक्त विषयान्व्ये वनपाल अंधेरी यांनी मा.उपविभागीय अधिकारी मुंबई.पश्चिम उपनगर, मा.तहसिलदार बोरीवली. मा.वरिष्ठ पोलीस निरिक्षक मालवणी पोलीस स्टेशन परिक्षण भूमापक गोरेगाव यांच्यासह 21.06.2019 रोजी सर्व्हे नं.263 पै.न.भु.क्र.2841 अ मध्ये असलेल्या कांदळवन क्षेत्रातील संयुक्त स्थळपाहणी कामी वनरक्षक वेसावे यांच्या समावेत हजर होते. तक्रारदार श्री.रेजी अब्राहिम यांच्या अर्जानुसार सदर क्षेत्रात कांदळवनाचा ऱ्हास होत असल्याबाबत सदरच्या हद्द उंचावरुन दिसावी म्हणून ड्रोन कॅमेऱ्याद्वारे तसेच व्हिडीओग्राफी व फोटोग्राफी करण्यात आलेली आहे.

मालवणी सर्व्हे नं.263 पै.न.भु.क्र.2841 अ च्या उत्तरेस मालाड मार्वे रोड आहे. रोडच्याबाजूने दक्षिण दिशेस लगून रोड आहे. सदर रोडच्या पुर्वेस काही अतिक्रमीत दुकाने व झोपडया आहेत सदर ठिकाणाच्या मागील बाजूस हिंदु,क्रिश्चन, मुस्लिम धर्मीयांची स्मशान भुमी आहे. दुकानाच्या दक्षिणेस एस.आर.के. ने बांधलेल्या मानवस्थळ को.ऑ.हौ. सोसायटीच्या ईमारती आहेत. सदर ईमारतीच्या पुर्व बाजूस कांदळवन दिसून येत आहे. वरील सोसायटीच्या दक्षिणेस एक नाला आहे.त्याच दक्षिणेस मुंबई मेट्रोचा टप्पा 2 व 7 चे कास्टिंग यार्डसाठीचे 35.000 चौ.मी. जागा असून त्याच्या सर्व बाजून दगडी भिंत व पत्रयाचे कुंपन आहे. सदर क्षेत्रास आर.एम.सी. चे भव्य प्लॉट आहे. सदर क्षेत्रात काही पक्कया खोल्या असून त्यात टेस्टींग लॅब, कॉक्रीट टयुब,हौद इत्यादी बांधकामे आहेत व त्याच्या उत्तर भागात गर्डर कास्टिंगचे काम सुरु आहे. सदर क्षेत्रामधील लेबर कॅम्प आहे. व साईड ऑफीस आहे. तसेच सदर क्षेत्राच्या उत्तर पुर्व भागातून कास्टिंगच्या कामातून निघालेली सिमेंटची स्लरी सोडण्यात आलेले आहे. तरी स्लरी पत्ररयाच्या कुंपनाच्या खालून निघून सदर क्षेत्राच्या पुर्व बाजूस पसरुन सिमेंटच्या स्लरीचा जाड थर तयार झाला आहे.

तसेच मुंबई मेट्रो गर्डर कास्टिंगचे काम मे. जे कुमार ईन्फ्रास्ट्रक्चर लि. या कंपनीला देण्यात आलेले आहे. MMRD यांना 35.000 चौ.मी. जागा भाडेपट्टयाने दिली असून मे. जे कुमार ईन्फ्रास्ट्रक्चर लि. हे वापरत आहे. त्याच्या पुर्व बाजूस सपाट जागा असून काही जागेत डेब्रीज पडलेले दिसले. त्याच्या पुर्व बाजूस कांदळवनाची झाडे आहे. सदर सपाट जागेच्या पुर्वेस 15 ते 20 अंदाजे मोठे सिंमेट पाईप व एक झोपडी वापरात आहे.

कास्टिंग यार्डच्या पश्चिम बाजूला एक झुणका भाकर केंद्र असून लगून रोड आहे. त्याच्या पुर्व बाजूस एव्हरशाईननगर याला जोडणारा रस्ता असून सदर रस्त्याच्या पुर्व बाजूस खाडीचे क्षेत्रात लोंखडी पुल बांधण्यात आला आहे. सदर रस्त्याच्या दक्षिणेस जॉगिंग ट्रॅक व बालउद्यान असून जॉगिंग ट्रॅक च्या दक्षिण बाजूस म्हाडाची कुंपन भिंत आहे. सदर ठिकाणी टिपू सुलतान मैदान क्र.2 असून त्याच्या पुर्व बाजूस खाडीच्या भागात कांदळवन आहे. तसेच टिपु सुलतान मैदानाच्या दक्षिण बाजूस टाटा पॉवर कंपनीची जागा असून सदर जागेत दगड सिंमेटचे बांधकाम सुरु असल्यासचे दूसन आले. व पश्चिमेस कुंपन भिंत आहे. त्या भिंतीच्या दक्षिणेकडे खाडीच्या काठालगत कचरा व रॅबीट पडल्याचे दिसून आले. व सदर ठिकाणी एका नाल्यावर सिमेंट पुल असून पुढे लगून रोड संपतो. सदर पुढच्या दक्षिण बाजूस काही प्रमाणात कांदळवन आहे. असे वनपाल अंधेरी यांनी त्यांच्या अहवालात नमुद केले आहे.

सदर क्षेत्राचे वनपाल अंधेरी व वनरक्षक यांनी जी.पी.एस रिडींग घेतले ते पुढीलप्रमाणे आहे.

1. N 19 11 431 E 72 49 628
2. N 19 11 509 E 72 49 646
3. N 19 11 357 E 72 49 566
4. N 19 11 264 E 72 49 507

वरील प्रमाणे जी.पी.एस रिडींग गुगल अर्थवर सुपर इंपोझ केले असता सदरचे क्षेत्र हे अधिसुचित राखीव कांदळवन नसल्याचे दिसून येत आहे. सदर क्षेत्र हे 50 मीटरच्या आतमध्ये असल्याचे दिसून येत आहे. माहितीसाठी सविनय सादर.

(एस.एम.देशपांडे)
वनपरिक्षेत्र अधिकारी,
मु.का.सं.घ. पश्चिम मुंबई

सोबत: पंचनामा, वनपाल अंधेरी यांचा अहवाल

प्रतिलीपी : मा. तहसिलदार ~~अंधेरी~~ बोरिवली यांना माहितीसाठी सादर.

O/C
Prasad
26-9-19

तहसिलदार बोरीवली, यांचे कार्यालय
रा माळा, नाटकवाला लेन,
डॉ. न. रा. करोडे मार्ग, एस. व्ही. रोड,
बोरीवली (प.), मुंबई-४०० ०९२.

वनपरीक्षेत्र कार्यालय
कांदळवन कक्ष, मुंबई (प.)
आवक क्र. 379
दिनांक 23.08.20..

विषय :- मा. विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांच्या अध्यक्षतेखाली खाजगी कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समितीमध्ये श्री. रेजी अब्राहम यांनी केलेल्या तक्रार अर्जावर स्थळपाहणी व चौकशी करण्याबाबत.

आ. क्र. / 56 / 2019
बोरीवली दि. 22/08/2019

प्रति,
मा. वनक्षेत्रपाल सो.
पश्चिम मुंबई, कां.सं.घ.

संदर्भ :- प. मुंबई / 367/2019-20 बोरीवली दि. 16/08/2019

रिपोर्ट :- वनपाल अंधेरी, प. मुंबई, कां.सं.घ.

महोदय, सविनय

उपरोक्त विषयानुसार रिपोर्ट सादर करतो की, मा. उपविभागीय अधिकारी, मुंबई पश्चिम उपनगर, मा. तहसिलदार बोरीवली, मा. वरिष्ठ पोलिस निरीक्षक मालवणी पोलिस स्टेशन, परिरक्षण भूमापक नगर भूमापन गोरेगाव, यांचे सह दि. 21/8/2019 रोजी सर्वे नं. 263 पै. न.भू.क्र. 2841 'अ' मध्ये असलेल्या कांदळवन क्षेत्राची संयुक्त स्थळपाहणी आणि वनरक्षक वेसाव यांचेसह तक्रारदार श्री. रेजी अब्राहम यांच्या अर्जानुसार सदर क्षेत्रात कांदळवनाचा ऱ्हास होत असल्याबाबत संयुक्त स्थळ पहाणी केली गेली. सदरची हद्द स्पष्टपणे दिसावी या करता ड्रोन यंत्रणेची मदत घेऊन व्हिडीओग्राफी व फोटोग्राफी करण्यात आली आहे.

न.भू.क्र. 2841 'अ' च्या उत्तरेस मालाड मार्वे रोड आहे. रोड वरुन दक्षिण दिशेस लगून रोड आहे. सदर रोडच्या पूर्वेस काही अतिक्रमित दुकाने आहेत व दुकानांच्या मागील बाजूस हिंदू, ख्रिश्चन व मुस्लिम धर्मियांची स्मशान भूमी आहेत व दफन भूमी आहेत. दुकानांच्या दक्षिणेस एम.आर.के ने बांधलेला मानव स्पर्श को. ऑप. हौ. सोसायटीच्या इमारती आहेत. सदर इमारतींच्या पूर्वेस कांदळवन दिसून येत आहे. वरील सोसायटीच्या दक्षिणेस मोठा नाला आहे. त्याच्या दक्षिणेस मुंबई मेट्रोचा टप्पा 2 च्या कारशेडसाठीची 35.000 [illegible]

Forward
03/09
Report to DFO

पत्र्याचे कुंपण आहे. व सदर प्लॉटात आर.एम.सी.
चे दोन मध्य प्लांट आहे. व सदर प्लॉटात काही पक्क्या
खोल्या बांधून त्यात टेस्टींग लॅब, ऑफीस केबिन, हौद
इत्यादि बांधकाम आहेत. व त्याच्या उत्तर भागात
गर्डर कास्टींग चे काम सुरु आहे. तसेच सदर प्लॉटाच्या
लेबर कॅम्प आहे. व साईट ऑफीस आहे. सदर प्लॉटाच्या
उत्तर-पूर्व भागातुन कास्टींगच्या कामातुन निघालेली सिमेंट
स्लरी सोडण्यात आलेली आहे. ही स्लरी पत्र्याच्या
कुंपणाच्या खालुन निघुन सदर प्लॉटाच्या पूर्व बाजुस खाडि
भागात पसरुन सिमेंटच्या स्लरीचा जाड थर तयार
झाला आहे.

तसेच मुंबई मेट्रो गर्डर कास्टींगचे काम मे.जे.
कुमार इनफ्रास्ट्रक्चर लि. या कंपनीस देण्यात आलेले आहे.
एम.एम.आर.डी.ए. यांना 35000 चौ.मी. जागा भाडेपट्ट्याने
दिलेली असुन सदर जागा जे. कुमार कंपनीमार्फत वापरत
आहे. त्याच्या पूर्व बाजुस मोकळी जागा असुन तेथे काही
भागात डेब्रीस टाकलेले आहे. त्याच्या पूर्व बाजुस
कांदळवनाची झाडे आहेत तसेच सदर मोकळ्या जागेच्या
पूर्वेस 15 ते 20 मोठे सिमेंट पाईप व मड आपटी
वापरत आहे.

कास्टींग यार्डच्या दक्षिण-पश्चिमेकडे छेडा जुना डा
भास्कर केंद्र/हॉटेल असुन लगुन रोड आहे त्याच्या
पूर्व बाजुस लगुन रोड व मफतलाल शांतिनगर यांना
जोडणारा रस्ता असुन सदर रस्त्याच्या पूर्व बाजुस
खाडीच्या क्षेत्रात लोखंडी पुल / सिमेंट पुल बांधकाम
चालु आहे. सदर रस्त्याच्या दक्षिणेस लगत जॉगींग
ट्रॅक व बालउद्यान असुन जॉगींग ट्रॅकच्या दक्षिण
बाजुस खाडीचे एम.एम.आर.डी.ए. चे कुंपण भिंत आहे.
तसेच सदर ठिकाणी टिपु सुलतान मैदान क्र. 2 असुन
त्याच्या पूर्व बाजुस खाडीच्या भागात कांदळवन
आहे. तसेच सदर टिपु सुलतान मैदानाच्या दक्षिण

जागेत ठिकाणी: सिमेंटचे चौकोनी बांधकाम सुरु असल्याचे दिसुन आले. व पश्चिमेस कुंपण भिंत आहे. त्या भिंतीच्या दक्षिणेकडे खाडीच्या भागालगत कचरा व डेब्रिज पडलेले दिसुन आले. व सदर ठिकाणी मध्य नाल्यावर सिमेंट पुल असुन पुढे लिंक रोड लगतचे सदर पुलाच्या दक्षिण बाजुस खाडी लगत काही प्रमाणात कांदळवन आहे..

सदर ठिकाणचे GPS रिडींग घेतले ते खालील प्रमाणे.

1) 19 11.431 / 72 49.628  2) 19 11.509 / 72 49.646 } पत्र्याच्या कंपाउंड बाहेरील

3) 19 11.357 / 72 49.566 → मैदानातील दगड व डेब्रिज

4) 19 11.264 / 72 49.507 – नाला.

वरील प्रमाणे GPS रिडींग गुगल अर्थवर सुपर इंपोज केले असता सदरचे क्षेत्र हे अधिसुचीत राखीव कांदळवन नाही.

सदरचा रिपोर्ट आपले माहितीसाठी व पुढील कार्यवाही साठी सविनय सादर करीत आहे.

सोबत/- पंचनामा

वनपाल [illegible]

प. मुंबई मु.का.सं.घ.

पंचनामा

मौजे :- मालवणी ①
दि- २१/८/२०१९

आम्ही खालील सह्या करणारे पंच प्रत्यक्ष परिस्थिती पाहून वस्तुस्थितीदर्शक पंचनामा लिहून देतो कि, आज दि २१/८/२०१९ रोजी श्री. उमेश बिरारी, उपविभागीय अधिकारी, मुं. पश्चिम उपनगर, श्री विनोद धोत्रे, तहसीलदार बोरीवली, श्री. जगदेव कालापाड, वरिष्ठ पोलिस निरिक्षक मालवणी पोलिस स्टेशन, श्री हर्षद साठे, वनपाल, कांदळवन कक्ष, श्री. समीर फणीबन्द, पोलिस निरिक्षक, (का वसु) मालवणी पोलिस स्टेशन, श्री. चंद्रकांत भागवत, परिरक्षण भूमापक, नगर भूमापन गोरेगाव यांनी मिळून संयुक्तपणे मौजे मालवणी, तालुका बोरीवली हद्दीतील सर्वे नंबर २६३पै, न. भू. क्र २८४९ 'अ' मध्ये असलेल्या कांदळवन क्षेत्राची तसेच कांदळवन क्षेत्राच्या पश्चिमबाजुस असलेल्या कास्टिंग यार्ड, टिपू सुलतान मैदान क्रमांक २, सदर मैदानाच्या दक्षिणेस असलेले सार्वजनिक शौचालय इत्यादी संपूर्ण क्षेत्राची फिरुन पाहणी केली. तसेच सदर क्षेत्रातील कांदळवनाची हद्द व कास्टिंग यार्ड, टिपू सुलतान मैदान क्रमांक २ इत्यादी जागांची हद्द उंचीवरुन स्पष्टपणे लक्षात यावी, यासाठी 'ड्रोन' तंत्रज्ञानाची/मशीनची मदत घेऊन संपूर्ण क्षेत्राची व्हिडिओग्राफी व फोटोग्राफी करण्यात आली.

न. भू. क्र २८४९ 'अ', च्या उत्तर सीमेवरुन पूर्व-पश्चिम दिशेने मालाड मार्वे रस्ता गेलेला आहे. सदर रस्त्यापासून दक्षिणेकडे न. भू. क्र २८४९ 'अ' च्या हद्दीमधून लागून रस्ता गेलेला आहे. सदर रस्त्याला पूर्वी 'कच्चा रस्ता' असे संबोधत असत. सदर रस्त्याच्या पूर्व बाजुस लागून न. भू. क्र २८४९ 'अ' च्या क्षेत्रात ओळीने अतिक्रमित दुकाने आहेत. सदर दुकानांच्या मागील अर्थात पूर्व

दफनभूमी एकमेकांस लागून आहेत. वरील अतिक्रमीत दुकानांच्या दक्षिणेस झोपडपट्टी पुर्नविकास प्राधिकरण यांनी बांधलेल्या 'मानवस्थळ' को.ऑप.हौ. सोसायटीच्या इमारती आहेत. सदर इमारतींच्या पूर्व बाजुस जमिनीवर चाळ सदृश्य बांधकाम व वस्ती आहे. सदर चाळसदृश्य वस्तीच्या अवतीभोवती कांदळवनाचे क्षेत्र व खारफुटीची झाडे उभी आहेत. 'मानवस्थळ' सोसायटीच्या इमारती व वरील चाळी यांच्या दक्षिणेस पूर्व-पश्चिम दिशेने एक नाला गेला आहे.

सदर नाल्याच्या दक्षिणेस एमएमआरडीए-मुंबई मेट्रो, रस्ता २ व ७ चे कास्टिंग यार्डसाठी दिलेली 35000 चौ.मी. जागा आहे. सदर जागेला सर्व बाजुने दगडी भिंत तसेच ~~प~~ लोखंडी पत्र्याचे कुंपण करण्यात आले आहे. सदर जागेत जाणे-येणेसाठी लगूनरोड लगत उत्तर आणि दक्षिण भागात दोन गेट/दरवाजे बसविण्यात आले आहेत. सदर क्षेत्रात दक्षिण भागात दोन आर.एम.सी (~~Re Redi~~ Readymix concrete) चे ~~सब~~ प्लान्ट आहेत. सदर प्लान्टच्या जवळ काही पक्क्या खोल्या बांधलेल्या असून त्यात टेस्टिंग लॅब, कॉंक्रीट क्युब टेस्टिंगचे हौद इत्यादी बांधकाम केलेले आहे. सदर भागाच्या उत्तर क्षेत्रात प्रत्यक्ष गर्डर कास्टिंगचे काम सुरू आहे. तसेच सदर क्षेत्राच्या पश्चिम भागात लेबर कॅम्प बांधलेला असून त्यात साधारणतः दहा खोल्या तात्पुरत्या बांधलेल्या आहेत. सदर खोल्यांच्या दक्षिणेस तात्पुरते साईट ऑफीस उभारलेले आहे. सदर क्षेत्राच्या उत्तर-पूर्व भागात कास्टिंगच्या कामातून निघालेली सिमेंटची स्लरी पूर्व बाजुला सोडण्यात आलेली आहे. कंपनीचे इंजिनियर श्री. सचीन भास्कर यांच्या सांगण्यानुसार उत्तर-पूर्व भागात असलेल्या sedimentation tank मधून पावसाचे पाणी ओवरफ्लो झाल्यामुळे सदरची स्लरी पत्र्याच्या कुंपणाच्या [illegible]

जाउ स्थर बसलेल्या आहे. त्यामुळे सदर क्षेत्रात एक प्रकारे सिमेंटच्या स्लॅब तयार झाला आहे.

मुंबई मेट्रो साठी गर्डर कास्टिंगचे काम मे.जे.कुमार इन्फ्रास्ट्रचर लि. या कंपनीस देण्यात आलेले असून एम.एम.-आरडीए यांना भाडेपट्ट्याने दिलेली 35000 चौ.मी. जागा सदर जे.कुमार कंपनीच्या मार्फत वापरात आहे. सदर क्षेत्राच्या पूर्व बाजूच्या कुंपणभिंती पलिकडे खाडीच्या काठापर्यंत काही अंशी सपाट जागा दिसून येते. सदर जागेत काही ठिकाणी जुन्या इमारती पाडल्यानंतर निघणारे अवशेष/डेब्रीज टाकलेले दिसून येतात. सदर सपाट भागात कांदळवनाचे वृक्ष दिसून येत नाहीत. मात्र सदर भागाच्या पूर्वेस असलेल्या खाडीच्या व दलदलीच्या क्षेत्रात कांदळवनाची/ खारफुटीची मोठी झाडे उभी असल्याचे दिसून येते. सदर खाडीच्या पश्चिम काठावर व उपरोक्त सपाट भागाच्या पूर्वेस मोठ्या व्यासाचे सिमेंट पाईप अंदाजे १५-२० ठेवलेले आहेत. तसेच त्यास लागून एक झोपडी बांधलेली असून त्यात कोणाचे तरी वास्तव्य असल्याचे दिसून आले.

वरील कास्टिंग यार्डच्या दक्षिण-पश्चिम कोपऱ्यात, कुंपण भिंतीच्या पश्चिमेस व लागून रोडला लगत एक झुणका-भाकर केंद्र/ छोटेखानी हॉटेल आहे. सदर कोपऱ्यापासून पूर्वेकडे लागून रोड व एव्हरशाईन नगर यांना जोडणारा एक रस्ता गेलेला आहे. सदर रस्ता कास्टिंग यार्ड क्षेत्राच्या दक्षिणेकडील कुंपण भिंतीस लागून पूर्वेकडे गेला आहे. पूर्वेकडे जाताना सदर रस्त्यावर उपरोक्त खाडीच्या क्षेत्रात लोखंडी पूल/ सिमेंट पूल बांधण्यात आला आहे.

वरील पूर्व-पश्चिम रस्त्याच्या दक्षिणेस लगत समांतर असा जॉगिंग ट्रॅक व बालउद्यान तयार करण्यात आले आहे. सदर जॉगिंग ट्रॅकच्या दक्षिण बाजूस देखील कुंपण भिंत म्हाडा बांधण्यात आलेली आहे. एमएसआरडीसी यांच्या माध्यमातून [illegible] भाग असून

सदर भागास 'टिपू सुलतान मैदान क्रमांक २' असे संबोधण्यात येते. सदर मैदानाच्या पूर्व बाजूस वरील खाडीच्या भाग असून सदर खाडीच्या क्षेत्रात मोठी कांदळवनाची वृक्ष उभी आहेत. टिपू सुलतान मैदान क्रमांक २ च्या दक्षिण पश्चिम भागात टाटा पावर कंपनी यांना कब्जेहक्काने दिलेली ३८५ चौ.मी जागा आहे. सदर जागेत फ्लाय-सिमेंटच्या माध्यमातून चौकोनी बांधकाम सुरू असलेले दिसते. तसेच इलेक्ट्रीक ट्रान्सफार्मर लगून रस्त्यालगत उभारलेले दिसते. टिपू सुलतान मैदान क्रमांक-२ च्या पश्चिम हद्दीवर अर्थात लगून रोडच्या पूर्व बाजूस सलग कुंपण भिंत बांधलेली आहे.

वरील कुंपणभिंतीच्या दक्षिण टोकाच्या पुढे गेले असता खाडीच्या पश्चिम काठालगत मोठ्या प्रमाणात घरगुती व औद्योगिक कचरा (रॅबीट) टाकलेला आहे. सदर क्षेत्रातून पूर्व-पश्चिम दिशेने एक नाला गेलेला असून सदर नाल्या-वर-लगून रोडवर मोठा सिमेंट पूल बांधण्यात आला आहे. सदर पूलावरून दक्षिणेकडे गेले असता लगून रोड खंडीत आलेला दिसून येतो. पूलाच्या दक्षिण भागात मोठ्या प्रमाणात घाणीचे व कचऱ्याचे साम्राज्य दिसून येते. सदरचा भाग खाडी लगत असल्याने त्याठिकाणी काही प्रमाणात कांदळवन असल्याचे दिसून येते. सदर कचऱ्याच्या क्षेत्रात दोन सार्वजनिक शौचालये बांधण्यात आलेली आहेत.

वरीलप्रमाणे पंचनामा दुपारी २ वाजता सुरू करून दुपारी ४ वाजता मिळून पूर्ण केला असे. दि २१/०८/२०१९.

समक्ष:-

२१/०८/२०१९
१) उ.वि.अ

२१/०८/१९
२) तहसीलदार बोरीवली

२१/८/१९
३) व.पो.नि. (मा.पो.स्टे)

१) श्री. रेजी अब्राहम.
वय:- ५० वर्षे,
रा. B-303, अथ्लॅड ओशन,
चारकोप, कांदिवली (प)
9969636309

२) श्री. अमिरउद्दीन आय अन्सारी,
वय:- ४४ वर्षे,
रा. न्यू कलेक्टर कंपाउंड, प्लॉ.क्र
२९ रू.नं ६०, मालवणी
9892418437